# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मुंबईतील आय.आय.टी. मधील जितेश शर्मा नावाच्या केमिकल इंजिनियरने विष पिवून आत्महत्या केल्याबाबत

**(१) २०४९९ (१०-०८-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील आय.आय.टी. मधील जितेश शर्मा नावाच्या केमिकल इंजिनियरच्या तिसऱ्या वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांने नुकतीच विष पिवून आत्महत्या केली आहे, हे खरे आहे काय,
(२) सदर आत्महत्या प्रकरणी चौकशी चौकशी करण्यात आली आहे, चौकशीत काय निष्पन झाले आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे,
(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात येऊन जितेश शर्मा या विद्यार्थ्याच्या आत्महत्याप्रकरणी पवई पोलीस ठाणे येथे अपमृत्यु नोंद क्र. ४३/१५ कलम १७४ सी.आर.पी.सी. अन्वये अपमृत्यु नोंद करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसिवण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत

**(२) २२०४६ (१०-०८-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसिवण्यासाठी पाच कोटीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीने महानगरपालिकेच्या मदतीने माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास तयार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासाठी नियोजन समितीने एक कोटी रुपयांची तरतूदही केली असून उर्वरित चार कोटी रुपये महापालिकेमार्फत खर्च होणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रस्तावास तीन महिन्यापासून गृहविभागाकडून अदयापही मान्यता दिली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व या प्रस्तावास तातडीने मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०८-२०१६) :**(१) व (२) होय.

कोल्हापूर महानगरपालिकेकडून नाविण्यपूर्ण योजनेअंतर्गत सेफ सिटी प्रकल्पाचे नियोजन करण्यात आले असून अंदाजे रु. ७.५ कोटी खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये रु ४ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. पहिल्या टप्पयाचे काम पूर्ण झाले आहे.
(३) व (४) गृह विभागास सदर प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. तथापि, सदर प्रकल्पाचे कामकाज समर्थ सिक्युरिटी सिस्टिम प्रा.लि. नवी मुंबई या कंपनीने केले असून कोल्हापूर शहरातील एकूण ६५ ठिकाणी १६५ सीसीटीव्ही कॅमेऱ्याची उभारणी करण्यात आलेली आहे.

---

### मुंबई मांटुगा येथे कारच्या डिक्कीत ठेवलेली रक्कम पाळविल्याबाबत

**(३) २२७५७ (१४-१२-८२००). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई मांटुगा येथे कारच्या डिक्कीत ठेवलेली २७ लाख, ५० हजार रुपयांची रक्कम लांबविल्याची घटना दिनांक १५ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी माटुंगा पोलीस स्थानकात तक्रार करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार डिक्कीतून लांबविलेली रक्कम हस्तगत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे,

सदर प्रकरणी माटुंगा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १५०/१५ भा.दं.वि.सं कलम ३७९, ४२७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(३) गुन्ह्याच्या तपासादरम्यान साक्षीदार तपासण्यात आलेले असून सध्या गुन्हा तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथे पकडण्यात आलेल्या विदेशी मद्याचे खोके भरलेला ट्रकची चौकशी करण्याबाबत**

**(४) २८५४५ (२१-०१-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील व्दारका येथे बर्फ मिश्रित मासळीने भरलेल्या क्रेट्समागे विदेशी मद्याची खोके भरलेला वातानुकुलीत ट्रक माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पकडण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदेशी मद्य फक्त मध्य प्रदेशातच विक्री करण्यासाठी असताना ते महाराष्ट्रात आणणाऱ्या संबंधितांविरुद्ध चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१६) :**(१), (२) व (३) नाशिक शहर हद्दीत अशा प्रकारची एकही घटना घडल्याची आढळून आलेले नाही.

---

**राज्यातील लाचखोर शासकीय अधिकारी व कर्मचा-यावर कारवाई करण्याबाबत**

**(५) ३०९३६ (२१-०१-२०१६). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक २० जुलै, २०१५ रोजी वा त्या सुमारास पत्र पाठवून लाच घेतल्याप्रकरणी दोषी ठरवून न्यायालयात शिक्षा ठोठावल्यानंतरही अद्याप ३२ सरकारी अधिकारी व कर्मचारी सेवेत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांच्यावर बडतर्फी कारवाई करण्याबाबत शासनाला कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाच घेताना प्रत्यक्षात अटक होऊनही १६४ जणांना अद्यापी निलंबित करण्यात आले नसून व त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कळवूनही अद्यापी शासनाने याबाबत निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच ३५ लाचखोरांच्या मालमत्तेवर जप्ती आणण्याबाबत शासनाने मंजुरी दिली असून अद्याप ३२ लाचखोरांची सुमारे २२ कोटींची मालमत्ता जप्त करण्याबाबत मंजुरी न देण्याची कारणे काय आहेत,
(४) उपरोक्त प्रकरणी निर्णय घेण्यास विलंब करीत असलेल्या संबंधीत अधिकाऱ्यांविरूध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१०-२०१६)** :(१) होय.
(२) लाचेच्या मागणीबाबत दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने शासकीय लोकसेवकास संबंधित शिस्तभंग विषयक प्राधिकाऱ्यांने निलंबित न करणे याबाबत दिनांक ३१.०८.२०१६ अखरेरीस एकूण १३१ प्रकरणे प्रलंबित आहेत.
(३) लोकसेवकांची अपसंपदा गोठविण्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागास प्राधिकारपत्र देण्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागने शासनास सादर केलेल्या ८ प्रकरणी कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) लोकसेवकास निलंबित करणे तसेच दोषसिध्दी नंतर बडतर्फ करणे याबाबतच्या प्रलंबित प्रकरणावर प्राथम्याने कारवाई करण्याबाबत मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २०.०७.२०१६ रोजी झालेल्या बैठकीस सर्व प्रशासकीय विभागांना सूचना देण्यात आले आहेत

---

**राष्ट्रीय महामार्ग क्र.६ या मार्गचे चोपदरीकरणाचे उतारावरील नावाची फेरफार करुन अन्य मार्गाने जमिनीच्या किंमती वाढवून फार मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार केल्याबाबत**

**(६) ३३५७४ (२३-१२-२०१५). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय महामार्ग क्र.६ या मार्गचे चोपदरीकरणाचे काम केवळ महसूल अधिकाऱ्याच्या भ्रष्ट प्रवृत्तीमुळे व ७/१२ च्या उतारावरील नावाची फेरफार करुन अन्य मार्गाने जमिनीच्या किंमती वाढवून फार मोठया प्रमाणावर गैरव्यवहार केला आहे काय, हे खरे आहे काय
(२) असल्यास, या प्रकरणात गैरव्यवहारात सहभाग असलेल्या श्रीमती हेमांगी भामरे, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन तत्कालिन तहसिलदार, श्री.आवळकंठे, श्री.बधान केदारनाथ गंगाधर संबंधीत तलाठी व मंडळ अधिकारी श्री.चंद्रकांत सिन्हा राष्ट्रीय महामार्ग अधिकारी तसेच लाभार्थी यांचेविरुध्द निलंबनाची कारवाई करण्यासंबंधी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ०३ फेब्रुवारी, २०१५ रोजी यांना निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय
(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित दोषी असण्याऱ्या अधिकाऱ्यानवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) होय, याप्रकरणी लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांना दिलेल्या दिनांक ०५/०२/२०१५ च्या निवेदनाच्या अनुषंगाने पोलिस उप अधिक्षक, अटी करप्शन ब्युरो, धुळे यांचे मार्फत चौकशी करण्यात आली. चौकशीमध्ये श्रीमती हेमांगी भामरे व इतर यांचेविरुध्द केलेल्या तक्रार अर्जातील भूसंपादनाची प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. तक्रार अर्जातील आक्षेपमध्ये तथ्य नसल्याचे निष्पन्न झाले असून प्रकरण बंद करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भ सिंचन विकास महामंडळात करोडो रुपयांचा झालेला गैरव्यवहार**

**(७) ३५८९१ (२१-०१-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भ सिंचन विकास महामंडळात झालेल्या करोडो रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक पथकामार्फत सुरु असलेला तपास पूर्ण झाला आहे काय,
(२) असल्यास, सदर तपासाचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास, सदर अहवालातील निष्कर्ष काय आहेत व यावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) सदर तपासाचा अहवाल अद्यापही प्राप्त झाला नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व किती कालावधीत अहवाल प्राप्त होण्याची अपेक्षा आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०९-२०१६)** :(१) यासंदर्भात गोसीखूर्द प्रकल्पातील घोडाझरी शाखा कालवा बांधकामाच्या निवदिा प्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत सदर पोलीस ठाणे नागपूर येथे गु.र.क्र. ३१७६/२०१६ तसेच गोसीखुर्द प्रकल्पातील मोखाबर्डी उपासा सिंचन योजनेच्या उच्च कालव्याच्या निविदा प्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत सदर पोलीस ठाणे नागपूर येथे गु.र.क्र३००९/२०१६ दाखल करण्यात आला आहे. सदर दोन्ही गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(२) या व्यतिरिक्त विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या अखत्यारितील एकूण ४० प्रकरणात लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी सुरु असून अद्याप शासनास अहवाल प्राप्त झालेला नाही.
(३) या संदर्भात दाखल गुन्ह्याची व चौकशाची व्याप्ती मोठी असून त्या तांत्रिक व प्रशासकीय बाबींची अचूक माहिती घेवून तपास करण्यात येत असल्याने चौकशी पूर्ण होण्यास अधिक कालावधी लागत आहे.

---

**मुंबई येथील गेटवे ऑफ इंडिया जवळील समुद्र किनाऱ्यावर हजार रुपायांचा नोटा तरंगत असल्याचे आढळल्याबाबत**

**(८) ३६१९६ (२१-०१-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील गेटवे ऑफ इंडिया जवळील समुद्र किनाऱ्यावर दिनांक ११ ऑगस्ट, २०१५ रोजी हजार रुपयांच्या नोटा तरंगत असल्याचे आढळले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर हजार रुपयांच्या नोटांच्या मोहापायी अनेक नागरीकांनी जीव धोक्यात घालुन नोटा संकलीत करणेकरिता गेले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) सदरहू प्रकरणी कुलाबा येथील गेटवे ऑफ इंडिया याठिकाणी काहीवेळा नागरीक अंत्यविधीच्या अस्थी विसर्जनासाठी येत असतात. त्यावेळी ते अस्थीसोबत पैसे वा तत्सम मौल्यवान वस्तू विसर्जन करतात. परंतु, अशाप्रकारे हजार रुपयांच्या नोटा तरंगत असल्याची कोणतीही घटना कुलाबा पोलीस ठाणेस नोंद नाही, सबब अहवाल निरंक आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चांदोली (ता.शिराळा, जि.सांगली) येथील सांगली, कोकरुड व शाहूवाडी पोलीस स्थानकांच्या चौक्याची झालेली दुरवस्था**

**(९) ३६९२० (२१-०१-२०१६). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदोली (ता.शिराळा, जि.सांगली) येथे असलेल्या ३४.४० टीएमसी क्षमतेच्या राज्यातील सर्वात मोठ्या मातीच्या धरणाच्या सुरक्षेकरीता सांगली, कोकरुड व शाहूवाडी पोलीस स्थानकाच्या तीन चौक्या अस्तित्वात असून तेथे २४ तास पोलीस कर्मचारी वास्तव्यास असूनही सद्य:स्थितीत सदरहू चौक्या असुरक्षित असून सोईसुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त चौक्यामध्ये आपतकालात जनरेटरची सोय नसून हिंस्त्र प्राण्यांचा वावर असून सदर ठिकाणी मधून-मधून विज ही जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी पोलीस कर्मचाऱ्यांना पिण्याचे पाणी, वीज, पंखे इत्यादी सुविधा उपलब्ध करण्याच दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१६) :**(१), (२) व (३) सदर धरणाच्या परिसरात एकुण चार पोलीस चौक्यांची उभारणी जलसंपदा विभागाकडून करण्यात आली असून, पत्र्यांच्या चौक्यामध्ये तात्पुरत्या सोयीसुविधेसह चौकया कार्यरत आहेत.

चांदोली धरणाचा भाग अतिशय दुर्गम असल्याने वांरवार वीज पुरवठा खंडीत होत असतो. सदर ठिकाणी जनरेटरची सोय नसल्याने जनरेटर व इतर सोयी-सुविधा पुरविण्याबाबत तसेच पोलीस चौकीची दुरुस्ती करण्यासाठी व त्यामध्ये इतर सोयी-सुविधा पुरविण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगती पथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चारकोप (मुंबई) येथील पोलिसांनी बनावट आधारकार्ड बनविणा-या टोळीला अटक केल्याबाबत**

**(१०) ३७८०१ (२१-०१-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चारकोप, कांदिवली (मुंबई) येथील पोलिसांनी कोणत्याही कागदपत्रांचा पुराव्याचा आधार न घेता केवळ पैसे घेऊन, आधार कार्ड बनविण्या-या टोळीला दिनांक १८ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या सुमारास अटक केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी पोलिसांनी अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्या येत आहे, तसेच बनावट आधारकार्डाला पायबंद घालण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) चारकोप पोलीस ठाणे, मुंबई हद्दीत बनावट आधारकार्ड बनविणाऱ्या टोळीस अटक केल्या प्रकरणी दिनांक १६ ऑगस्ट, २०१५ रोजी भा.दं.वि.स. कलम ४६४, ४६५, ४६७, ४६८, ४२०, ३४ प्रमाणे गु.र.क्र.२९१/२०१५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. याबाबत अटक आरोपी यांच्या विरुध्द पुरेसा पुरावा उपलब्ध झाल्यावरुन मा.न्यायालय, बोरीवली, मुंबई येथे सी.सी. क्र. ९४/ पीडब्ल्यु/१६ अन्वये दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर येथे अपंगांकडून लाच घेताना महात्मा फुले अपंग वित्त विकास महामंडळाच्या वसुली अधिकाऱ्यांस लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पकडल्याबाबत**

**(११) ३९८११ (२४-०५-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयात कर्ज मंजुरीची फाईल पुढे पाठविण्यासाठी अपंगांकडून १५०० रुपयांची लाच घेताना महात्मा फुले अपंग वित्त विकास महामंडळाच्या वसुली अधिकाऱ्यांस लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजीच्या सुमारास पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,
(३)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०८-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) तक्रारदार श्री.शंकर चंद्रकांत कळके, यांचे किराणा दुकान सरु करण्यासठी श्री.अभिषेक अशोक खांडेकर, वसुली अधिकारी जिल्हा व्यवस्थापक कार्यालय, सोलापूर यांनी रु. २,०००/- इतकी लाचेची मागणी करुन खाजगी इसम श्री.लक्ष्मण नागाप्पा कोळी यांच्यामार्फत रु.१,५००/- इतकी लाचेची रक्कम स्वीकारतांना दिनांक ११.०१.२०१६ रोजी पकडण्यात आले आहे.

यासंदर्भात त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन ठाणे, सोलापूर शहर येथे गु.र.क्र.२६/१६, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७, १२, १३(१) (ड) सह १३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून दिनांक ११.०१.२०१६ रोजी अटक केली असून सद्यस्थितीत मा.न्यायालयाने त्यांची जामीनावर मुक्तता केली आहे, सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील ३२ गावांमधील पोलीस पाटलांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१२) ४०५२८ (२५-०५-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील ३२ गावांमधील पोलीस पाटलांची पदे गत वर्षापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस पाटील हा घटक महत्वाचा असल्याने सदर पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) पोलीस पाटील पदाकरीता बिंदुनामावली अद्ययावत करण्याचे काम सुरु आहे. बिंदुनामावली अद्ययावत झाल्यानंतर पोलीस पाटीलांची रिक्त पदे भरण्यात येणार आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर तसेच नंदूरबार शहरातील गोवंशाची हत्या रोखण्याबाबत**

**(१३) ४०५६२ (२०-०५-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदूरबार शहर पोलिसांनी दिनांक १० ऑक्टोबर, २०१५ रोजी रात्री दोन घरांमधून १,५०० किलो बैलाचे मांस आणि कापलेल्या बैलांचे अवशेष जप्त करण्याची कारवाई केली, हे खरे आहे का,

(२) तसेच अहमदनगर मधून मुंबईमध्ये गोमासाची तस्करी करणाऱ्या टोळीला विक्रोळी पोलिसांनी ऑगस्ट २०१५ रोजी वा त्या दरम्यान अटक केली आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणांची गोवंशाची तस्करी, गोवंशची हत्या करणे, गोवंशाचे मांस विक्रीचा उद्‌योग करणे यांविरोधात सतत तक्रारी करूनही गोवंश हत्या बंदी संदर्भातील कायद्‌यानुसार कारवाई होत नसून तक्रारी करणा-या गोरक्षक आणि संबंधित संघटनांनाच पोलीसांच्या छळाला सामोरे जावे लागत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गोवंश हत्या प्रतिबंधक कायद्‌यात अधिकृत गोरक्षकांना त्रास होऊ नये याकरिता ओळखपत्रे देऊन त्यांना पोलीसमित्र संकल्पनेप्रमाणे साहाय्यासाठी घेणे आणि त्यांच्या तक्रारीवरून पोलीसांना शोध घेण्यास बंधन घालण्यात येणार आहे का,

(५) असल्यास, या संदर्भात दोषींवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) गोवंश हत्या होऊ नये याकरीता शहरात पेट्रोलिंग व फीक्स पॉईट लावून बंदोबस्त करण्यात येतो.

(५) १. पोलीस स्टेशन विक्रोळी येथे गु.र.क्र. २४३/१५ कलम ४२९, ३४ भादंवि. सह मुंबई महानगरपालिका कायदा कल ४१२ महाराष्ट्र पुशसंवर्धन कायदा १९९५ कलम ५, ५(अ), ५(ब), ५(क), ९(अ), ९(ब), ११ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

२. नंदूरबार शहर पो.स्टे. वर्ग ५ गु.र.क्र.६५/२०१५ गो.ह.सु.का. महा.प्रा.संरक्षण (सु.) अधिनियम १९९५ कलम ५, ५(क), ९, ९(अ), तसेच वर्ग ६ गु.र.नं. ६६/२०१५ गो.ह.सु.का. महा.प्रा.संरक्षण (सु) अधिनियम १९९५ कलम ५, ५(क), ९, ९(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

३. अहमदनगर जिल्ह्यात गोवंशाची कत्तल करणे, गोमास वाहतूक करणे इ. कारणासाठी दिनांक ०१.०१.२०१६ ते ३१.०५.२०१६ या कालावधीत २९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण (जि.ठाणे) येथील घरफोडीबाबत**

**(१४) ४१२३७ (२०-०५-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील पत्रीपूल परिसरातील सर्वोदयनगर सोसायटीमध्ये तसेच राधे कृष्ण पार्क सोसायटी, श्रीमलंग रोड येथील प्रत्येकी तीन घरे फोडण्यात आल्याची तक्रार दिनांक ०६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास कल्याण बाजारपेठ पोलिस स्थानकात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी पोलिसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०१६) :**(१) हाये, हे खरे आहे.
(२) कल्याण येथील पत्रीपूल परिसरातील सर्वोदय सागर सोसायटीतील तीन घरांमध्ये प्रवेश करून झालेल्या चोरीप्रकरणी बाजारपेठ पोलीस स्टेशन येथे गु.र. क्र. ७/२०१६ भा.द.वि.कलम ४५७, ३८०, ४५८, ४५९, ३४ प्रमाणे वाढीव कलम ३९५, ३९७ अन्वये गुन्हा दाखल आहे.
याबाबत चार आरोपींना अटक करण्यात आली असून सदरहू प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहरात आणि पिंपरी-चिंचवडमध्ये वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी दिल्लीमध्ये यशस्वी झालेला समविषमचा प्रयोग राबविण्याबाबत**

**(१५) ४२२६१ (०४-०३-२०१४). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवडमध्ये मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असतानाही शहरातील वाहनांचा सरासरी तासी वेग प्रति तास २३ कि.मी असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी दिल्लीमध्ये यशस्वी झालेला समविषमचा प्रयोग येथे राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) पुणे शहरामध्ये मोनोरेल, मेट्रोरेल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कार्यरत नाही. तसेच, सम. विषम वाहनांचा नियम राबविल्यास लोकांचा दोन-दोन वाहने घेण्याकडे कल वाढेल व शहरामधील वाहनांची संख्या वाढून वाहतूकीची समस्या अधिक गंभीर होऊ शकते. त्यामुळे पुणे व पिंपरी-चिंचवडी शरामध्ये सम-विषम प्रयोग राबविण्याची आवश्यकता नाही.

---

**काशिमिरा (ता.भायंदर, जि.ठाणे) येथील सृष्टी कॉम्पलेक्स तसेच परिसरात चोऱ्यांचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(१६) ४३००१ (२४-०५-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काशीमिरा (ता.भायंदर, जि.ठाणे) येथील सृष्टी कॉम्पलेक्स तसेच परिसरात मोठ्या प्रमाणात चोऱ्यांचे प्रमाण वाढले असुन घरे फोडुन चोऱ्या केल्या जात असल्याचे माहे जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित पोलीस स्थानकात तक्रार दाखल करण्यात आल्या असुनही याबाबत अद्यापही कारवाई करण्यात आली नसल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०८-२०१६) :**(१) ठाणे ग्रमिण जिल्हयातील कशिमीरा पोलीस स्टेशन हद्दतील सृष्टी कॉम्पलेक्स तसेच त्यांच्या आसपासच्या परिसरात घरफोडी व चोरी या सदराखाली सन २०१४ मध्ये अनुक्रमे ०२ व ११ तसेच सन २०१५ मध्ये अनुक्रमे ०२ व ३० आणि फेब्रु, २०१६ अखेर चोरी या सदराखाली १० गुन्हे दाखल आहे.

(२) ठाणे ग्रामिण जिल्हयातील कशिमीरा पोलीस स्टेशन हद्दतील सृष्टी कॉम्पलेक्स तसेच त्यांच्या आपासच्य परिसरात घरफोडी व चोरी याबाबत दाखल गुन्हयांच्या तपास सुरू आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये कोणत्याही प्रकारचे भितीचे वातावरण नाही.

(३) सदर प्रकरणी गुन्ह घडू नये या गुन्हे घडू नये या करीता खालील प्रमाणे उपाय योजना करण्यात आल्या आहेत.

१. कार्यक्षेत्रामध्ये दिवसा व रात्री बीट मार्शल नेमले जातात, त्यांच्या करवी सक्त पेट्रोलींग करण्यात येते.

२. सदर परिसरात तसेच पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात ठिकठिकाणी अचानकपणे नाकाबंदी करून व्यक्ती/वाहने चेक करण्यात येतात.

३. परिसरामध्ये घरुॊडया-चोऱ्या होऊ नयेत याकरीता वृत्तपत्र तसेच उपलब्ध डिजीटल माध्यमांद्वारे सुचना देवून जनजागृती करण्यात येते

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील पोलीस उपनिरिक्षकाने स्वत:वर गोळी झाडून आत्महत्येचा प्रयत्न केल्याबाबत**

**(१७) ४३०११ (२४-०५-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे अवैध दारुविक्री करणाऱ्याकडे पोलीस उपनिरिक्षकाने दोन हजार रुपयांची लाच मागितली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दोन हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीचे पथक पाचपावली येथील पोलीस वसाहतीत पोहचल्यावर पोलीस उपनिरिक्षकाने स्वत:वर गोळी झाडून आत्महत्येचा प्रयत्न केला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर लाचखोरी प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१०-२०१६) :**(१) होय
(२) होय
(३) व (४) लाचेची रक्कम स्वीकारल्यासंदर्भात ३ आरोपीवरुिध्द पाचपावली पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७, १२ तसेच भा.द.वि. कलम ३०९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तास सुरू आहे.

---

## अहमदनगर जिल्ह्यात लाचखोरीच्या प्रकरणांमध्ये पोलीस इतर विभागाच्या तुलनेत जास्त असल्याबाबत

**(१८) ४३८०० (२४-०५-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यात लाचखोरीच्या प्रकरणांमध्ये पोलीस इतर विभागाच्या तुलनेत जास्त असून गत वर्षात २३ लाचखोर आढळून आले असून १५ पोलिसांवर कारवाई करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर लाचखोरीच्या घटना घडू नयेत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१६) :**(१) होय. सन २०१५ मध्ये अहमदनगर जिल्ह्यात एकूण ३८ सापळा प्रकरणी कारवाई करण्यात आली. त्यापैकी पोलीस विभागातील १५ प्रकरणामध्ये १६ पोलीस कर्मचारी व १ खाजगी व्यक्ती यांचेविरुध्द न्यायालयात दोषारोत्र पत्र दाखल करण्यात आले आहे.
(२) व (३) भ्रष्टाचाराविरुध्द जनजागृती मोहिम राबविण्यात येते. तसेच प्राप्त तक्रारीबात लाचलुचतप प्रतिबंधक विभागाद्वारे प्राथम्याने कारवाई करण्यात येते.

---

**येवला (जि.नाशिक) येथील काशीकापडी समाजाच्या महिलेला जात पंचायतीने बहिष्कृत केल्याबाबत**

**(१९) ४३९५६ (१७-०५-२०१६). श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथील काशीकापडी समाजाच्या महिलेला जातपंचायतीने माहे जानेवारी २०१५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यासुमारास बहिष्कृत केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिलेला पतीच्या प्रेतासमोरच सर्वासमक्ष तूप लावून आंघोळ घालणे तसेच तिला रात्रभर अंधार खोलीत डांबून ठेवण्याची जाचक व अनिष्ट प्रथा काशीकपाडी समाजामार्फत होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित विधवा महिलेने सार्वजनिक न्याय मंत्र्यासह संबंधित विभागाला निवदेन दिल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अनिष्ट प्रथेद्वारे महिलेला बहिष्कृत करणाऱ्या जात पंचायतीच्या सदस्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०८-२०१६) :**(१) होय, सदर घटना फिर्यादी महिलेचे माहेर शुक्रवार पेठ, पुणे येथे दिनांक २४ डिसेंबर, २०१५ ते दिनांक २९ डिसेंबर, २०१५ दरम्यान घडली आहे.

(२) होय,

(३) नाही.

(४) सदर घटना शुक्रवार पेठ, पुणे येथे घडली आहे माहे दिनांक २४ डिसेंबर, २०१५ रोजी ते दिनांक २९ डिसेंबर, २०१५ पर्यंत आरोपी क्र. १ ते ९ यांनी फिर्यादीची आई व सावत्र आई यांना काशी कापडी समाजामधील सती अंधश्रध्देच्या प्रथेप्रमाणे पतीच्या मृत्युपश्च्यात तुप लावून प्रेतासोबत अंघोळ घालून अंधर खोलीस एकटीला रात्रभर डांबून ठेवले. सदर प्रथेस फिर्यादीने विरोध दर्शविल्याने आरोपी क्र. १ ते ९ यांनी फिर्यादीला समाजातून बहिष्कृत केले अहे.

सदर घटनेच्या अनुषंगाने फिर्यादी महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार येवला शहर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ०१/२०१६ प्रमाणे माहे दिनांक ०२ जानेवारी, २०१६ रोजी २१.४५ वा भा.द.वि. कलम ३४२,३४ व अंधश्रध्दा निर्मुलन कायदा कलम ३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हा पुणे शहरात घडला असल्याने सदर गुन्हा खडक पोलीस ठाणे, पुणे येथे वर्ग करण्यात आलेला आहे,

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसंतनगर (जि.लातूर) येथे विद्यार्थीनीने छेडछाडीला कंटाळून केलेली आत्महत्या**

**(२०) ४५४१८ (१७-०५-२०१६). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड (ता.जि.लातूर) येथील काटगाव-वसंतनगर तांडा येथील अवघ्या तेरा वर्षाच्या इयत्ता सातवीच्या वर्गात शिकणा-या मुलीची शाळेत जाता-येता छेड काढणा-या गावातील टवाळखोर वैजनाथ चव्हाण यांची तक्रार त्यांच्या आई वडील व भावाकडे केली असता त्यांनी मुलीच्या नातेवाईकांना केलेल्या मारहाणीमुळे अस्वस्थ झालेल्या मुलीने दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी अंगावर रॉकेल ओतून स्वत:ला जाळून घेतल्यामुळे तिचा दिनांक २ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या दरम्यान मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच शाळेतील मुलीच्या छेडछाडीचे वाढते प्रमाण, त्याचे होणारे अपहरण व होणाऱ्या अत्याचाराच्या संदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) फिर्यादीची मयत मुलगी समता विद्यालय कासारजवळा येथे ७ वी वर्गात शिकत होती. मयत मुलगी माहे दिनांक १ जोनवारी, २०१६ रोजी शाळेत जाताना तांडयावरील आरोपीने ग्रीटींग कार्ड व चैन जबरदस्तीने तीला दिली. आरोपीच्या घरी जाऊन विचारणा केली असता भांडण-तक्रार केली. मयत मुलीने आरोपी छेडछाड करतो असे सांगितले होते. दिनांक २ जानेवारी, २०१६ रोजी मयत मुलगी संडासला जाण्याचा बहांणा करून घराजवळील शेतात जाऊन अंगावर रॉकेल ओतून घेऊन पेटवून घेतले. मयत मुलीस सरकारी दवाखाना, लातूर येथे दाखल केले. तिचेवर उपचार सुरू असताना माहे दिनांक २ जानेवारी, २०१६ रोजी मरण पावली तीच्या मरण्यास अरोपी कारणीभूत आहे असे मयत मुलीचे वडीलांनी दिलेल्या जबाबवरून ते डी.एम.ओ., सरकारी दवाखाना, लातूर यांना मुलगी ९० टक्के भाजल्याने उपचार सुरू असताना ती मरण पावली असे पोलीस स्टेशन गातेगाव येथे गु.र.नु २/१६ कलम ३०६, ३५४ भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा तपास सुरू आहे.

शाळेतील तसेच महाविद्यालयातील मुलींची छेड काढणाऱ्या रोड-रोमीओ, कॉलेजमधील विद्यार्थी व इतर लोकांविरुध्द कार्यवाही करण्यासाठी जिल्हास्तरावर दामिनी पथक तसेच महिला फिरते गस्त पथक कार्यरत करण्यात आले आहे. शहरातील व पोलीस स्टेशन हद्दीत शाळा, महाविद्यालये, आश्रम शाळेस भेटी देऊन मुलींच्या व महिलांच्या अडचणीची दखल घेऊन कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेलापूर (जि.ठाणे) येथील किल्ल्याच्या दुरुस्तीबाबत**

**(२१) ४५५२५ (२८-०४-२०१६). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेलापूर (जि.ठाणे) येथील ऐतिहासिक वारसा असलेला किल्ला चिमाजी आप्पाजी यांनी बांधल्याचे पुरावे आढळतात व सदर किल्ला मोडकळीस आलेला असून तो सध्या अत्यंत जीर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर किल्याच्या जिर्णोध्दारासाठी सिडकोकडे अनेकदा मागणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्याच्या पुरातत्व खात्याने किल्ल्याच्या जिर्णोध्दारासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०१६) :**(१) होय.
(२) बेलापूर किल्ला हा नवी मुंबईचा एकमेव ऐतिहासिक वारसा असून सिडकोने या किल्लाच्या संर्वधनासाठी व पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्यासाठी पूर्वीपासूनच प्रयत्न केले आहेत. शासनाने बेलापूर किल्ल्याचे जतन व संवर्धन करण्यासाठी तसेच पर्यटन स्थळ म्हणून मान्यता मिळण्याबाबत अंदाज समितीची स्थापना केली. अंदाज समितीच्या शिफारशीनुसार सिडकोने मे. किमया. पुणे या संमत्रंकाची नेमणूक केली आहे.
(३) पुरातत्व विभागामार्फत राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आलेल्या किल्ल्याच्या वा स्मारकाच्या जतन व दुरुस्तीची कार्यवाही केली जाते. सदर किल्ला राज्य सुरक्षित स्मारक नाही. सबब पुरातत्व विभागामार्फत जतन व दुरुस्ती करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण (पश्चिम) जोशिबाग येथील पोलीस वसाहती धोकादायक झाल्याबाबत**

**(२२) ४५६३७ (२०-०५-२०१६). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (पश्चिम) येथील पोर्णिमा सिनेमाजवळ जोशिबाग येथे सन १९३३ मध्ये उभारलेल्या चाळी व सन १९६९ मध्ये एक इमारत पोलीस वसाहतीसाठी बांधली असून सदर इमारत व चाळी धोकादायक झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलीस वसाहतीतील पोलिसांचे कुटुंब जीव मुठीत धरून वास्तव्य करत असून वसाहतींचा पुनर्विकास न केल्यास याठिकाणी मोठी दुर्घटना होऊ शकते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जीर्ण असलेल्या वसाहतींचा पुनर्विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) जोशिबाग, कल्याण (पश्चिम) येथील पोलीस वसाहतीमधील इमारत क्र. ५४ मधील ५४ निवासस्थाने अशी एकूण १०५ निवासस्थाने धोकादायक असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने घोषित केल्यानंतर निवासस्थाने रिक्त करण्याकरीता पोलीस विभागामार्फत नोटीस बजावण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने ७८ निवासस्थाने रिक्त करण्यात आली असून, उर्वरित २७ निवासस्थाने रिक्त करुन घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे, सदर निवासस्थाने पुर्णपणे रिक्त झाल्यानंतर पुर्नविकासाबाबत निर्णय घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यात अनेक अवैध धंदे होत असल्याबाबत**

**(२३) ४६०८३ (२०-०५-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यात अनेक अवैध धंदे होत असून कर्नाटक सीमा भागातून अनेक गावात विशेषता हॉटेल, धाबे यासह काही अधिकृत हॉटेलमध्येही दारु पोहचत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दारु तस्करी करणारी टोळी /रॅकेट मोठया प्रमाणात कार्यरत असून त्यावर नियंत्रण ठेवणे स्थानिक पोलिसांसमोर आव्हान निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१६) :**(१), (२) व (३) कोल्हापूर जिल्ह्यामधील शिरोळ तालुक्यात कर्नाटक सीमा भागातून अवैधरित्या मदीरा/दारु वाहतुक किंवा विक्री बाबत गुन्हे अगर तक्रार दाखल नाही. परंतु शिरोळ तालुक्याच्या कार्यक्षेत्रामधील शिरोळ जयसिंगपूर व कुरुंदवाडी पोलीस ठाणे हद्दीमध्ये स्थानिक लोकांनी अवैध मदीरा/दारुची विक्री केल्याबाबत सन

२०१५ मध्ये एकत्रित ७४ गुन्हे दाखल करण्यात आले असून ७५ आरोपींना अटक करण्यात आली तसेच सन २०१६ मध्ये फेब्रुवारी अखेर या तिन्ही पोलीस ठाण्यात एकत्रित २७ गुन्हे दाखल करण्यात आले असून २९ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सन २०१५ मध्ये एकत्रित रु.१,३९,३४५/- व सन २०१६ फेब्रुवारी अखेरपर्यंत रु. ४,४१,५७५/- मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**वर्धा शहरातील हमदापूर येथील एका दुकानात गावठी बॉम्बचा स्फोट झाल्याबाबत**

**(२४) ४६१५३ (२४-०५-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा शहरातील हमदापूर येथील बिजवार कॉम्प्लेक्समधील एका दुकानात गावठी बॉम्बचा स्फोट होवून एक युवक जखमी झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ च्या चौथ्या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०१६) :**(१) व (२) वर्धा जिल्ह्यांत मौजे हमदापूर येथे माहे दिनांक २६ जानेवारी, २०१६ रोजी श्री.संजय देशमुख यांचे दुकानासमोरील सांडपाण्याचे नालीत चिकूच्या आकराचे सुतळीने घट्ट बांधलेले स्फोटक ४ नग मिळून आले. त्यातील एक स्फोटक मोरेश्वर बिडकर यांनी सिमेंट रोडवर आपटल्याने त्याचा स्फोट होऊन ते जखमी झाले. या घटनेची माहिती श्री. संजय देशमुख यांनी पोलीसांना दिली व त्यानुसार घटनेच्या गुन्ह्यांची नोंद पो.स्टे. दहेगाव येथे अप.क्र १२/१६ कलम ५, ६ भारतीय स्फोटक कायदा अंतर्गत करण्यात आली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलीस बॉम्ब शोधक पथकाने स्फोटके उचलून गावाबाहेर सुरक्षित स्थळी नेऊन त्याचा नाश केला. सापडलेल्या ४ वस्तुंपैकी दोन वस्तू हया चिकू असल्याचे व दोन वस्तू बॉम्ब असल्याचे आढळून आले सदर दोन बॉम्बचा नाश करण्यात आला घटनास्थळाच्या आहूबाजूच्या लोकांचे जबाब घेण्यात आलेले असून सदर गुन्हा तपासाधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजूरा (जि.चंद्रपुर) राज्य मार्ग परिवहन महामंडळ आगारातील**
**वाहकाचा संशयी मृत्यू झाल्याबाबत**

**(२५) ४६३६१ (२४-०५-२०१६). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजूरा (जि.चंद्रपुर) राज्य मार्ग परिवहन महामंडळ आगार येथे कार्यरत श्री. गणपत हनमंतु लाडसे (वाहक) यांचा दिनांक २८ जानेवारी, २०१६ रोजी आगार व्यवस्थापक व वाहतुक निरीक्षक यांचे जाचामुळे संशयी मृत्यू झाला असून नोकरीतून बडतर्फ करण्याची धमकी दिली जात असल्याचे मयत वाहकाच्या पत्नीने दिलेल्या तक्रारीत नमूद करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१६)** :(१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, राजूरा येथे अपराध क्र. ३/२०१६ कलम १७४ जा फौ मधील तपासामध्ये असे निष्पन्न झाले की, मृतक गणपत लाडसे यांनी दि. २१/१/२०१६ रोजी प्रकृती खराब झाल्याने त्याचे पत्नीने त्यांना सामान्य रुग्णालय, चंद्रपूर येथे उपचारासाठी भरती केले. औषधोपचार सुरु असताना दि. २८/१/२०१६ रोजी गणपत लाडसे यांचा मृत्यू झाला. मृतकाचे शवविच्छेदन केले असता मृतकाचे मृत्यूचे कारण Bilateral pneumonia असे दिलेले आहे. आजपावेतो झालेल्या तपासात मृतकाचे मृत्यूशी आगार व्यवस्थापक व वाहतुक निरीक्षक यांचा संबंध असल्याचे निष्पन्न झालेले नाही. मृतकाच्या पत्नीने मृतकाच्या मृत्यूच्या दुसऱ्या दिवशी सादर केलेल्या चिठ्ठीवरील हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे भिरडा (जि.हिंगोली) येथील अपहार करणाऱ्या दोषीवर लाचलुचपत प्रतिबंध कायद्यांतर्गत कारवाई करण्याबाबत

**(२६) ४६३७० (१६-०५-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भिरडा (जि.हिंगोली) येथे अपहार करणाऱ्या अध्यक्ष सचिव, तांत्रिक सल्लागार उपविभागीय ग्रामीण पाणी पुरवठा अभियंता, कार्यकारी अभियंता व इतर दोषी जबाबदार अधिकारी यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंध कायद्यांतर्गत कारवाई करण्याबाबत स्थानिक नागरिकांनी पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंध विभाग, हिंगोली यांचेकडे दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-०१६६)** :(१) होय.

(२) व (३) तक्रार अर्जातील अक्षेप हे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद हिंगोली यांचेशी संबंधित असल्याने जिल्हापरिषद, हिंगोली यांचेशी संबंधित असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातून चोरी झालेल्या दुचाकी व चारचाकी वाहनांचा शोध लागलेला नसल्याबाबत**

**(२७) ४६४१९ (२४-०५-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातून गत चार वर्षात चोरी झालेल्या दुचाकी व चारचाकी वाहनांपैकी तब्बल ४०० वाहनांचा शोध लागलेला नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील पोलीस विभागात मनुष्यबळ व पोलीसांकरिता वाहनांची संख्या वाढविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) चंद्रपूर जिल्ह्यामागील ४ वर्षात सन २०१२ ते २०१६ (माहे जानेवारी अखेर पावेतो) पोलीस स्टेशलना एकूण ६९४ दुचाकी/१२७ चारचाकी वाहन संदर्भात दाखल गुन्ह्याचा तपास करण्यात आला असून त्यापैकी २७१ दुचाकी/४१ चारचाकी वाहनांच्या चोरीबाबतचे गुन्हे उघडकीस आलेले असून त्यात ३५३ दुचाकी /५७ चारचाकी वाहने हस्तगत करण्यात आहेत. उर्वरित ३४१ दुचाकी /७० चारचाकी वाहनांचा अद्यापही शोध लागलेला नाही. सदर वाहनांच्या शोधाकरीता पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर यांचे मार्गदर्शनाखाली एक विशेष पथक तयार करण्यात आले असून त्याचेद्वारे तपास करण्यात येत आहे.

(३) चंद्रपूर जिल्ह्यातील पोलीस विभागात मनुष्यबळ व पोलीसांकरीता वाहनांची संख्या वाढविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नविन सिडको नाशिक परिसरामध्ये वाहने जाळण्याच्या घटना वारंवार घडत असल्याबाबत**

**(२८) ४६७१० (२०-०५-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक नविन सिडको परिसरामध्ये गत काही वर्षापासून सातत्याने वाहने जाळण्याची प्रकरणे घडत असून पुन्हा एकदा वाहने जाळण्याचा प्रकार दिनांक १ नोव्हेबर, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, वाहने जाळण्याच्या घटना वारंवार घडत असल्याने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६)** :(१) सदर घटना दि. ३१/१०/२०१५ रोजी घडली असून त्याबात अंबड पोलीस स्टेशन, नाशिक येथे दि. ३१/१०/२०१५ रोजी गुरनं ३५५/२०१५ भां.द.वि. कलम ४३५, ४२७ प्रमाणे अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्याचा तपास चालु आहे.

(२) सदर परिसरामध्ये नवीन पोलीस चौकी तयार करण्यात आली असून पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. पोलीसाकडून २४ तास पेट्रोलींग करण्यात येत आहे. तसेच लोकांमध्ये जनजागृती करुन त्यांना सतर्क राहण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. तसेच पोलीस स्टेशन हद्दीतील दुकाने व सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले आहेत. तसेच घरासमोर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात आलेले आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## राज्यातील अनुसूचित जाती जमातींच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या वाटपात झालेल्या घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी विशेष कृती दलांची स्थापना करण्याबाबत

**(२९) ४६७५४ (२८-०४-२०१६). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती जमातींच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या वाटपात मोठ्या प्रमाणात घोटाळे झाल्याची बाब समोर आल्याने मा. मुख्समंत्री यांनी याप्रकरणी चौकशी करण्यासाठी विशेष कृती दलांची स्थापना करण्याबाबत गृह विभागाला लेखी आदेश दिले होते, हे खरे आहे का,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यासाठी अद्यापही कृती दलांची स्थापना केली गेली नाही हे खरे आहे काय असल्यास त्याची कारणे काय आहेत व यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे,

(३) असल्यास, उपरोक्त कृषी दलांची स्थापना करुन या प्रकरणाची तातडीने चौकशी करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०९-२०१६)** :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभागामार्फत देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती प्रकरणमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याकरिता श्री.के. व्यंकटेशम अपर पोलीस महासंचाक (प्रशिक्षण), मुंबई यांच्या अध्यक्षते खाली विशेष चौकशी पथक (टास्कफोर्स) ची स्थापना दि. १५/१/२०१६ च्या शासन निर्णयान्वये करण्यता आली आहे. तसेच सदर विशेष चौकशी पथैकास चौकशी पुर्ण करण्यासाठी शासन निर्णय दिनांक १२ जुलै, २०१६ अन्वये ६ महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे. विशेष चौकशी पथकामार्फत सदर प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

---

### अकोला जिल्ह्यात गौण खनिजाच्या चोरीचे प्रमाण वाढल्याबाबत

**(३०) ४६९२३ (२४-०५-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात रेती घाटांचा लिलाव विलंबामुळे सदर गौण खनिजाच्या चोरीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेल्हारा तालुक्यात रेती माफियांचा अवैध वाहतूक करणारा विना नंबर असलेला टिप्पर पकडून तहसीलदार तेल्हारा यांनी गुन्हा नोंद केला असून रेती वाहतूकदाराने संबंधीत तहसीलदार यांना धमकाविल्याच्या गुन्ह्याचीही नोंद झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१६) :**(१) अकोला जिल्ह्यात सन २०१६ मध्ये माहे मे अखेर पावेतो गौण खनिज रेती चोरी बाबत एकूण १३ गुन्हे दाखल आहेत. गुन्ह्यामध्ये २५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यामध्ये एकूण रुपये १,१५,८००/- चे गौण खनिज जप्त करण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे.

सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरुन ४ आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन, तेल्हारा, जि.अकोला येथे अप.क्र. ०४/२०१६ कलम ३७९, ३५३, ५०६, ३४ भादंवि सह कलम २०(१) गौण खनिज कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर प्रकरणी ४ आरोपींचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने व त्यांचेविरुध्द सबळ पुरावे उपलब्ध असल्याने आरोपींता विरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात तसेच मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात बेकायदा शस्त्रांचा वापर होत असल्याबाबत

**(३१) ४७१२३ (२४-०५-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तसेच मुंबई शहरात गुन्हेगारीच्या आकडेवरुन मोठ्या प्रमाणात बेकायदा शस्त्रांचा वापर तसेच तस्करी होत असल्याची माहिती समोर आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात वाढत्या बेकायदा शस्त्रांना अटकाव करण्यासाठी तसेच तस्करी रोखण्यासाठी पोलीस यंत्रणेकडून कोणती ठोस यंत्रणा उभारण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०१६) :**(१) व (२) महाराष्ट्र राज्यात बेकायदा शस्त्रांना अटकाव करणेसाठी आणि तस्करी रोखण्यासाठी भारतीय हत्यार १९५९ अन्वये जानेवारी २०१६ मध्ये बेकायदा शस्त्रांच्या तस्करीबाबत ११ गुन्हे दाखल असून त्यामध्ये २० आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच बेकायदा शस्त्रांच्या वापराबात ३४ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ५९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच गुप्त खबऱ्यांमार्फत गोपनीय माहिती गोळा करून शस्त्रांची अवैध निर्मिती, वितरण, खरेदी, विक्री करणाऱ्या इसमांवर धाड टाकून कारवाई करण्यात येते. शरीराविरुध्द वा मालमत्तेविरुध्दच्या गुन्ह्यात बेकायदेशिर शस्त्रांचा वापर करण्यात आला असेल अशा गुन्ह्यामध्ये त्या शस्त्रांचा स्त्रोत काय आहे याबाबत शोध घेणेत येवून सखोल तपास करण्यात येतो.

सरकारी अथवा कायदेशिर शस्त्रे चोरीला गेल्यास किंवा हरविल्यास त्याबाबतची माहिती पोलीसांना देणे बंधनकारक करण्यात आले आहे. संशयित ठिकाणी,गुन्हेगारांचे अड्डे असलेली ठिकाणे येथे अचानक कोंबिग ऑपरेशन, सर्चिंग, नाकाबंदी केली जात आहे. शस्त्रांचे मान्यता प्राप्त व परवानाधारक वितरक/दुकानदार यांचे रेकॉर्ड, शस्त्रसाठा, खरेदी विक्रीचे व्यवहार यांचेवर कोटेकोरपणे लक्ष ठेवले जाते व वरिष्ठ पोलीस आधिकाऱ्याकडून त्यांची नियमित व अचानक तपासणी करून नियमबाहय व्यवहार आढळून आल्यास त्यांचेवर कारवाई करण्यात येते. बेकायदा शस्त्रांना अटकाव करणेसाठी आणि तस्करी रोखण्यासाठी अशा प्रकारच्या गुन्हयांचा पोलीसांकडून सखोल तपास करण्यात येवून आरोपींना शिक्षा होणेसाठी सर्वतोपरी उपाययोजना करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पोलीस अधिकाऱ्यांच्या वार्षिक गुन्हे आढावा बैठकीवर करण्यात आलेल्या अनावश्यक खर्चाबाबत

**(३२) ४७२१४ (०७-०५-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुष्काळी स्थिती असतांनाही मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास वार्षिक गुन्हे आढावा घेण्याकरिता पोलीस अधिकाऱ्यांच्या बैठकीकरिता राज्यातून आलेल्या २५० पोलिस अधिकाऱ्यांकरिता सात ते आठ हजार किंमतीच्या रुम तसेच दीड हजारापेक्षा जास्त किंमतीची जेवणाची थाळी इत्यादि करिता लाखो रुपये खर्च करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय बैठकांसाठी सुसज्ज असे यशवंतराव चव्हाण प्रबोधिनी उपलब्ध असतांनाही अशा प्रकारे शासकीय पैशाची उधळपट्टी करण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच महाराष्ट्र राज्य पोलीस क्रिडा स्पर्धेकरिता आलेल्या आयपीएस अधिकाऱ्यांना मुंबई शहरातील चार पंचतारांकित हॉटेलमधील ८० खोल्यांचे आरक्षण करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरचा खर्च कोणत्या निधीतून करण्यात आला आहे तसेच राज्यात दुष्काळी परिस्थिती व शेतकऱ्यांच्या आत्महत्या असे गंभीर प्रश्न असतांनाही शासनाच्या पैशाची उधळपट्टी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१), (२), (३) व (४) महाराष्ट्र राज्य पोलीस क्रिडा स्पर्धा २०१५ चे आयोजन पुणे येथे करण्यात आले होते या स्पर्धेला लागूनच दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी मा. मुख्यमंत्री याच्या अध्यक्षतेखाली वार्षिक गुन्हे आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीसाठी आवश्यक खर्च उदा. निवासस्थान अल्पोहार इ. पोलीस कल्याण निधीमधून करण्यात आला आहे.

यशवंतराव चव्हाण प्रबोधनी या ठिकाणी एवढ्या मोठया प्रमाणात आसन व्यवस्था व जेवणाची व्यवस्था शक्य नसल्यामुळे निवास्थानाची व्यवस्था ही पोलीस कल्याण निधीतून पुणे शहरातील ३ वेगवेगळया हॉटेल मध्ये सवलतीच्या दराने करण्यात आली होती.

---

**आडेगाव (ता.झरीजामणी, जि.यवतमाळ) येथे सिलिंडरचा स्फोट होऊन लागलेल्या आगीत तीन घरे जळाल्याबाबत**

**(३३) ४८०९३ (१७-०५-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडेगाव (ता.झरीजामणी, जि.यवतमाळ) येथे सिलिंडरचा स्फोट होऊन लागलेल्या आगीत तीन घरे जळून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची घटना दिनांक ७ जानेवारी, २०१६ रोजी घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदरहू नुकसानग्रस्त नागरिकांना शासनाकडून आर्थिक मदत देण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१६) :**(१) व (२) दिनांक ०६ जानेवारी, २०१६ रोजी घरगुती गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन ४ घरे जळून अंदाजे ४.५ लाख रूपयांचे नुकसार झालेले आहे.

सदर प्रकरणी पो.स्टे. मुकुटबन यांच्याकडून चौकशी करण्यात आली आहे. सर्व चारही व्यक्तींना शासनाचे निकषाप्रमाणे तहसिलदार, झरीजामणी यांचे मार्फतीने प्रत्येकी ३८०० रूपये प्रमाणे आर्थिक मदत माहे दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात मुलींची विक्री करणारे मोठे रॅकेट असल्याबाबत

**(३४) ४८७४९ (१६-०५-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुलींची विक्री करणारे मोठे रॅकेट अस्तित्वात असून औरंगाबाद परिसरात सुमारे ६ दलालांना अटक करण्यात आल्याचे माहे डिसेंबर २०१५ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०१६) :**(१) व (२) फिर्यादी मुलीचा आरोपीसोबत विवाह झाला होता. तीचा नवरा, सासू नणंद जेठ व दिर यांनी क्रूर व अमानुषणे शारिरीक छळ केला व जिवे मारण्याचा प्रयत्न केला वगैरे दिनांक १ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन सिडको औरंगाबाद शहर येथे गु.र.नं. ७५३/१५ कलम ४९८, ३०७, ३७७, ३४ भादिव प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाच अरोपीनां अटक करण्यात आले आहे. तपासात आरोपी कडून जप्त केलेल्या लॅपटॉपची पाहणी केली असता,पैसे देण्याचे व्यवहार दिसून आले असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्यावरून आरोपी क्र. ६ ते १२ यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आले असून, गुन्हयात कलम १०९, ३७०, २०१, ३४२, ३४३, ३४४४ भा.दं.वि. सह कलम ४, ५ (ह) (आय) (एन), ६, १२, १७ लैंगिक अपराधापासून बालकाचे संरक्षण कायदा, बाल न्याय अधिनियम २००० कलम ९, १०, ११ प्रमाणे वाढीव कलम समाविष्ट केले आहे.

आरोपी क्र. ६ ते १२ यांनी आरोपीच्या कुटुंबाकडून ९५ हजार रूपये घेऊन अल्पवयीन फिर्यादी मुलीस आरोपीसोबत लग्न करून दिले आहे. आरोपी विरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून, सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

राज्यात होणाऱ्या महिला व मुलींची अनैतिक कामाकरित देहविक्री व्यापार यास प्रतिबंध करण्याकरिता १२ अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष स्थापन केले आहेत. सन २०१५ अखेर पर्यत सदर कक्षांनी धाडी टाकून ६०७० बळीत महिला व मुलीची सुटका करण्यात आली आहे. त्यात १८ वर्षाखालील ५४९ मुली व १८ वर्षाखालील ५४९ मुली व १८ वर्षावरील ५५२१ महिला व मुलींची सुटका करण्यात आली आहे. अनैतिक मानवी वाहतूक करणारे ४००६ दलालांना अटक करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केळशी-उंबरशेत (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथून १० बॉक्स जिलेटीन जप्त करण्यात आल्याबाबत**

**(३५) ४८९६२ (२०-०५-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केळशी-उंबरशेत (ता.दापोली, जि.रत्नागिरी) परिसरातून दिनांक १३ जानेवारी वा त्यासुमारास ठाणे येथील दहशतवाद विरोधी पथकाने १० बॉक्स जिलेटीन जप्त केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकारणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी दहशतवाद विरोधी पोलीस ठाणे, काळाचौकी, मुंबई द.वि.प, गु.र.नं ०२/२०१६ भा.दं. वि.स. क २८६, सह भारताचा स्फोटकांचा कायदा १८८४ कलम ९ (B) (१) (b) सह भारताचा स्फोटक पार्थाचा कायदा १९०८ चे कलम ४, ५ व ६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून त्यामध्ये दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.सदरचा गुन्हा तपासधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साक्री (जि.धुळे) तालुक्यातील ४५ गावातील पोलीस पाटलांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३६) ४९४४९ (१७-०५-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील डोमकाणी या गावांमध्ये गत २० वर्षापासून पोलीस पाटलांची नेमणुक करण्यात आली नसल्याचे तसेच या तालुक्यातील ४५ गावातील पोलीस पाटलांची पदे गत १० ते १५ वर्षापासून रिक्त असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त गावांमध्ये ग्रामस्तरावर शांतता निर्माण करण्यास अडथळा येत असल्यामुळे नागरिकांनी वारंवार पोलीस पाटलांची पदे भरली जावीत अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पोलीस पाटलांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१) डोमकाणी गावातील पोलीस पाटील पद दि.२३.३.२०१० पासून रिक्त आहे. सद्य:स्थितीत साक्री तालुक्यातील ४५ गावातील पोलीस पाटलांची पदे रिक्त आहेत.
(२) व (३) पोलीस पाटील कार्यरत नसलेल्या गावांचा कार्यभार लगतच्या गावाचे पोलीस पाटील यांना देण्यात आलेला आहे. तसेच, पोलीस पाटलांची रिक्त पदे भरण्याकरिता अनुशेष बिंदुनामावली अद्ययावत करुन विभागीय स्तरावरुन प्रमाणित करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरोरा येथील (जि.चंद्रपूर) येथे बनावट प्रमाणपत्र तयार करुन कोट्यावधीची काम करणा-या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत**

**(३७) ५०२१२ (२४-०५-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरोरा येथील (जि.चंद्रपूर) एका कंत्राटदारांच्या नोंदणी प्रमाणपत्राच्या आधारे स्वत:चे बनावट प्रमाणपत्र तयार करुन त्या आधारे कोट्यावधीची कामे करणारा कंत्राटदार सुशील नरेड्डीवार यांच्यावर माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान बांधकामातील गैरव्यवहाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांचेवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरुन सुशील नरेड्डीवार याच्याविरुध्द दि. ६/१/२०१६ रोजी सावली, पोलीस स्टेशन, चंद्रपूर येथे अप.क्र.०५/२०१६कलम ४६५, ४६८, ४७१ ४२०, भादंवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक करुन त्याचा पिसीआर घेण्यात आलेला आहे. आरोपीचे हस्ताक्षर नमुने प्राप्त करण्यात आले असून ते परिक्षणाकरिता हस्ताक्षर तज्ञ, नागपूर यांचेकडे तपासणीकरीता पाठविण्यात आले आहे. गुन्हा तपासावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर शहरातील रामनगर येथील भारतराजा अपार्टमेंटमधे दारु जप्त केल्याबाबत**

**(३८) ५०२२५ (२४-०५-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात स्थानिक गुन्हे शाखा पथकाने दिनांक २७ जानेवारी, २०१६ रोजीच्या सुमारास रामनगर येथील भारतराजा अपार्टमेंट मधील फ्लॅट क्र.७ मध्ये १२ लाख १७ हजार रुपयांची दारु जप्त केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी ३ आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन, चंद्रपूर शहर येथे अप.क्र. ४६/२०१६ कलम ६५(ई), ८३ मुदाका सहकलम १८८ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर ३ आरोपींना अटक करुन गुन्ह्याचा तपास करण्यात आला आहे. आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील ओशिवरा येथील श्रीमती मुमताज बादशाह या वृध्द महिलेची हत्या करण्यात आल्याबाबत**

**(३९) ५०९८० (२४-०५-२०१६). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील ओशिवरा येथील श्रीमती मुमताज बादशाह या वृध्द महिलेची दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६ रोजी गळा चिरुन हत्या करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर हत्येची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळले व त्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०१६) :**(१) होय.
(२) या प्रकरणी श्री. अहमद जुनेद बादशाह यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गु.र.क्र. ९०/१६ कलम ३०२ भा.द.वि. अन्वये दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून सदरहू प्रकरण नयायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना येथील सहाय्यक निबंधक कार्यालयातील कनिष्ठ लिपिक महिलेस लाच स्विकारतांना पकडल्याबाबत**

**(४०) ५१५४४ (२०-०६-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना येथील सहाय्यक निबंधक कार्यालयातील कनिष्ठ लिपिक महिला कर्मचाऱ्यास दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०८-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) जालना येथील सहाय्ययक निबंधक कार्यालयातील कनिष्ठ लिपीक श्रीमती वनिता संजय आहेर यांना दिनांक ०५ डिसेंबर, २०१५ रोजी लाच स्विकारताना पकडलेले असुन त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे कदीम, जालना येथे गु.रुनं. ३१०६/२०१५ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम कलम ७, १३(१) (ड) सह १३(२) अन्वये गुन्हा करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी दोषारोपपत्र क्रमांक २५/२०१६ दिनांक ११ मार्च, २०१६ रोजी दाखल केले असून त्याचा विशेष खटला क्रमांक ०८/२०१६ आहे. सदरचे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

---

**सोलापूर येथील वाढत्या चोरीच्या प्रकरणाची चौकशी करण्याबाबत**

**(४१) ५२२५२ (१६-०५-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर येथील वसंत विहार मधील सीए गणेश पावले यांच्या घरातून चोरट्यांनी ३५ तोळे सोन्याचे दागिने आणि सुमारे पाच लाख रुपये पळविले असून जुना गोहाटी नाका येथे डॉ.ठक्कर यांच्या घरी ६० तोळे दागिन्यांची माहे जानेवार २०१६ मध्ये चोरी झाली आहे तसेच दोन महिन्यापूर्वी जैन गुरुकुल प्रशालेतील शिक्षक संजय भस्मे (रा.वसंत विहार जवळ) यांच्या घरात दिवसा चोरी झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर येथील वाढत्या चोरीच्या प्रकरणाची चौकशी करुन छडा लाण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१६) :**(१) होय, सीए.गणेश पायले यांच्या घरातून अज्ञात चोरट्यांनी ३५ तोळे सोन्याचे दागिने व पाच लाख रूपये चोरीला गेले आहेत. त्याबाबत चावडी पोलीस ठाणे येथे गु.र.नं ४०/ २०१६ भां.द.वि. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा असुन गुन्ह्याचा तपास चालु आहे.

डॉ. जगदीश टक्कर यांचे घरातून अज्ञात चोरट्यांनी ८० हजार रूपये रोख व ४० तोळे सोन्याचे दागिने असा एकूण ९,२२,०००/- रूपयाचा माल चोरीला गेला आहे. त्याबाबत बझार पोलीस ठाणे, सोलापूर येथे गु.र.नं. १६/२०१५ भा.दंवि. कलम ४५७, ४५४, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्यांची अ समरी मा. न्यायालयात प्रलंबित आहे.

गुरूकुल शाळेतील शिक्षक संजय भस्मे यांच्या घरातून अज्ञान चोरट्यांनी ६०००/- रूपये व सोन्या चांदीचे दागिने असा एकूण ५४,०००/- रूपयाचा माल चोरीला गेल्याबाबत चावडी पोलीस ठाणे सोलापूर येथे गु.र.न १८३/२०१५ भा.दंवि. कलम ४५४, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्हा तपासाधीन आहे.

(२) सोलापूर शहरातील वाढत्या घरफोडी व चोरीस आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्तालय कार्यक्षत्रातील पोलीस ठाणेच्या हद्दीत रात्रीची गस्त व नाकाबंदी करीता पोलीस स्टेशन स्तरावर जास्तीतजास्त अधिकारी व कर्मचारी यांना नेमून त्यांना घर फोडी सारखे ६२ गुन्हे उघडकीस आणून १०३ आरोपीतांना अटक करण्यात आली असून त्यांचेकडून गुन्ह्यातील एकूण ५६१४६००/- रुपयांचा माल हस्तगत करण्यात आलेला आहे.

तसेच शहरातील व हद्दवाढ भागातील नागरिकांशी सतत संपर्क ठेवून त्यांना वर्तमान पत्र व इतर माध्यमाद्वारे प्रसिध्दी देवून सर्तक व जागरूक राहणेबाबत समुपदेशन करण्याचे काम चालू आहे. तसेच सर्व पोस्टे, हद्दीत दिवसा-रात्रीची पेट्रोलींग, पुरूष व महिला कर्मचारी यांचे बीटमार्शल मोटार सायकल पेट्रोलींग, रात्रग्रस्त चालू केली आहे. तसेच जे गुन्हे उघडकीस आलेले नाहीत त्या गुन्ह्यांतील आरोपींना निष्पन्न करून जास्तीत जास्त गुन्हे उघड आणण्याबाबत अधिपत्याखाली असणारे पोलीस उप आयुक्त, सहा पोलीस आयुक्त व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना लेखी आदेश दिले आहेत,

(३) विलंब झालेला नाही.

---

**म्हाडा वसाहतींच्या पुनर्वसनाबाबत**

**(४२) ५२७९६ (१७-०५-२०१६). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडा इमारतीच्या पुनर्वसनाबाबत ९३/(५) धोरणात बदल करण्यात आलेल्या आदेशाला एक वर्ष होवून ही म्हाडाकडून त्याची अद्याप अंमलबजावणी करण्यात आली नसल्यामुळे म्हाडा वसाहतीच्या पुनर्वसनाचे काम रखडले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडा वसाहतीचे पुनर्वसनाचे काम तातडीने होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०६-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही म्हाडाच्या मुंबईतील वसाहतींच्या पुनर्विकासासंदर्भात विनियम ३३(५) मधील तरतुदीनूसार कार्यवाही करण्यात येते.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक शहरात तक्रारदाराने पकडून दिलेला अवैद्य फटाक्याचा ट्रक कारवाई न करता सोडून दिल्याबाबत**

**(४३) ५३०९७ (२०-०५-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात दिनांक ६ नोव्हेंबर, २०१५ रोजी पकडून देण्यात आलेला अवैद्य फटाक्याचा ट्रक कारवाई न करता सोडून दिल्यानंतर तक्रारदारालाच जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या

पोलीस अधिकाऱ्यांना पोलीस आयुक्तांनी पाठीशी घातल्याचे प्रकरण माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) सदर प्रकरणी पोलीसांनी तपासात फटाक्याच्या ट्रकचा पंचनामा केला परंतु त्यात आक्षेपार्ह संशयीत वस्तु मिळून आलेल्या नाहीत. तसेच जास्त डेसिबलचे फटाके आढळून आले नाहीत. तसेच ट्रकचे बजन केले असता ते वाहतुकीच्या नियमानुसार बरोबर वजन असल्याचे आढळून आल्याने सदर टक्र फटाक्यासह सावित्री फटाके एजन्सीच्या मालकांच्या ताब्यात देण्यात आला आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**दौंड (जि.पुणे) रेल्वे स्थानकाजवळ थांबलेल्या आझाद हिंद एक्स्प्रेसमध्ये चोरट्यांनी लुटमार केल्याबाबत**

**(४४) ५३२३७ (२०-०५-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि.पुणे) रेल्वे स्थानकाजवळ थांबलेल्या आझाद हिंद एक्स्प्रेस या ट्रेन मध्ये चोरट्यांनी माय-लेकींवर धारदार शस्त्राने हल्ला करून लुटमार केली व नंतर ट्रेनवर जबर दगडफेक केल्याची घटना मार्च, २०१६ वा त्या दरम्यान घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी तपासामध्ये फिर्यादी व तिची आई ह्या दोघी आझाद हिंद एक्सप्रेसने पुणे ते हावडा प्रवास करीत असताना चोरट्यांनी खिडकीतून हात घालून फिर्यादीची पर्स चोरुन नेण्याचा प्रयत्न केला व धारदार शस्त्राने फिर्यादी व त्यांचे आईचे हातावर दुखापत केली.

सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरुन दौंड लोहमार्ग पोलीस ठाणे येथे ४ आरोपीविरुध्द गु.र.क्र. १६/२०१६ कनलम ३९७, ३४ भादंवि, आर्म ॲक्ट कलम ४, २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानुसार दोन आरोपींना अटक करुन त्यांचे विरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. उर्वरित २ आरोपींचा शोध घेऊन त्यांचे विरुध्द पुरवणी दोषारोपपत्र सादर करण्याची तजवीज ठेवली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे-पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात शवविच्छेदनासाठी आणलेल्या मृत मुलीचा मृतदेह १२ तास ठेवल्याबाबत**

**(४५) ५५७६४ (२९-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात (वायसीएम) ८ दिवसांच्या मृत मुलीचा देह शवविच्छेदनासाठी दाखल केला असताना शवविच्छेदन करणारे डॉक्टर रजेवर असल्याने १२ तास उलटून गेले तरी शवविच्छेदन न केल्यामुळे नातेवाईकांत संताप पसरला असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पर्यायी डॉक्टरची नेमणूक न करणाऱ्या व्यवस्थापनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे मार्फत आढावा घेतला असता, प्रस्तुत प्रकरणी जबाबदार असणाऱ्या सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार डॉ.श्रीराम भंडारे व डॉ.राजीव शहारे यांना निलंबीत करण्यात आले असून उर्वरित दोन अधिकाऱ्यांची चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथे एका विद्यार्थिनीवर अपहरणानंतर सामूहिक बलात्कार करण्यात आल्याबाबत**

**(४६) ५६०८३ (१२-०९-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे एका विद्यार्थिनीवर अपहरणानंतर सामूहिक बलात्कार केल्याचा प्रकार माहे एप्रिल, २०१६ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच नागपूर शहरातील ही दुसरी घटना असून मुलींवर होणाऱ्या अत्याचारांचे प्रकारात वाढ होत असून गुन्हेगारीला आळा बसण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१६)** :(१) होय.

(२) सदर घटनेची चौकशी करण्यात आली असून पिडीत मुलगी हि तिचे मैत्रिणीचे घरुन पायदळी घरी परत येत असताना अज्ञात ४ आरोपी मुलांनी कारमध्ये जबरदस्तीने बसवून तिच्या हाताला गुंगीकारक इंजेक्शन देवून सामूहिक बलात्कार केला अशी फिर्याद दिल्यावरुन पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी. अपराध क्रमांक ५०३/२०१६ कलम ३६६ (अ), ३७६(ड), ३२८, ३४ भादंवि. सह कलम ६ पोक्सो कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल केला, गुन्ह्यातील चारही आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

(३) गुन्हेगारीला आळा बसण्यासाठी नागपूर शहर पोलीस आयुक्तालयांअंतर्गत पेट्रोलींगमध्ये वाढ करण्यात आली, दामिनी पथक कार्यान्वीत आहे. अपॅ आय वॉच पोलीस सुरु करण्यात आले, मिडीयामार्फत कार्यशाळा, कॉलेज, मिडीया वाहन डिस्प्ले इलेक्ट्रॉनिक बोर्ड, महिला बैठका, मोहल्ला समिती, नागरिक सभेत माहिती देण्यात येते, सुसज्ज, सशस्त्र फिरते कमांडो पथकाची पेट्रोलिंग सुरु आहे. नवीन ॲण्ड्रॉईड मोबाईल ॲप सुरु करण्यात आले असून सदर ॲपचे नाव प्रतिसाद ॲप असे आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये अतिदक्षता विभाग (आयसीयु) सुरु नसल्याबाबत

**(४७) ५६२७५ (२९-०८-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या एकाही रुग्णालयामध्ये अतिदक्षता विभाग (आयसीयु) सुरु नसल्याचे दिनांक २१ मार्च, २०१६ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेच्या रुग्णालयामध्ये तज्ञ डॉक्टर नसल्याने अतिदक्षता विभाग बंद असून पालिकेची एकही ब्लड बँक, ब्लड स्टोरेज युनिट सुरु नाही, तसेच, क्षमतेपेक्षा कमी खाटांचे रुग्णालय पालिकेकडून चालविले जावून रुग्णालयांसाठी बांधून ठेवलेल्या इमारती पाडून नवीन इमारती बांधण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेतील रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा असल्याने नागरिकांना बाहेरुन औषधे खरेदी करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०१६)** :(१) व (२) अंशत: खरे आहे.

पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरु रुग्णालयात अतिदक्षता विभाग चालू करण्याकरिता आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ, तज्ञ डॉक्टर तसेच २४ तास प्रयोगशाळेची उपलब्धता नसल्याने अतिदक्षता विभाग बंद आहे तसेच पुणे महानगरपालिकेची ब्लड बँक नाही हे ही खरे आहे.

रुग्णालयांकरिता बांधलेल्या इमारतींमध्ये रुग्णालये कार्यान्वित असून सर्व रुग्णांची बेड्स क्षमता ११२६ खाटांची आहे व ही सर्व रुग्णालये पूर्ण क्षमतेने सुरु आहेत.

(३) हे खरे नाही.

पुणे महानगरपालिकेमार्फत विविध प्रक्रिया राबवूण औषधांची खरेदी करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**म्हाडाच्या धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत सेक्टर-५ च्या पात्र झोपडीधारकांना फ्लॅटचा ताबा हस्तांतरित करुनही ते झोपडीचा ताबा म्हाडाला देत नसल्याबाबत**

**(४८) ५६३०१ (२९-०८-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत सेक्टर-५ च्या पात्र झोपडीधारकांना दिनांक ३ मे, २०१६ रोजी फ्लॅटचा ताबा हस्तांतरीत करुनही ते झोपडीचा ताबा म्हाडाला देत नसल्याची बाब नुकतीच शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडीधारकांनी आपल्या झोपडया म्हाडाला दिल्या नाहीत त्याबद्दल त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०७-१०-२०१६) :**(१) धारावी अधिसूचित क्षेत्रातील सेक्टर-५ मध्ये म्हाडाच्या जमिनीवरील “जे” क्लस्टरमधील २६५ पात्र निवासी झोपडीधारकांना ताबापत्र देऊन दि. ०३.०५.२०१६ रोजी इमारत क्रमांक १ मधील सदनिकांचा ताबा देण्यात आला आहे व त्यांच्या झोपड्या रिकाम्या करून झोपड्यांचा ताबा म्हाडाने घेतला असल्याचे म्हाडा, मुंबई मंडळ यांनी कळविले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**राज्यात डान्सबारवर संपूर्ण बंदी आणण्याबाबत**

**(४९) ५९४७७ (२३-०८-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात डान्स बार सुरु करण्यात येऊ नये या मागणीसाठी विविध सामाजिक संघटनांनी आझाद मैदानावर निदर्शने केल्याचे दिनांक ७ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात डान्सबारवर संपूर्ण बंदी आणण्याबाबत शासनाने आपली भुमिका स्पष्ट करुन कायद्याची निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१०-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. डान्सबार बंदीसाठी सरकारने परीपूर्ण कायदा करावा या मागणीसाठी विरोधी मंच या संघटनेमार्फत आझाद मैदारावर दिनांक ६/५/५२०१६ रोजी निदेर्शने करण्यातआली होती.

(२) डान्सबार वर नियमान करण्यासाठी महाराष्ट्र हॉटेल उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रुम) यांमधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६ हा कायदा करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर येथील आयटीआयच्या विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करण्याबाबत**

**(५०) ६२३०० (२९-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दुष्काळ जाहीर केलेला असताना केवळ शासनाने आदेश न दिल्यामुळे लातूर येथील आयटीआयच्या विद्यार्थ्यांना परिक्षा शुल्क भरावे लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिक्षाशुल्क माफ करावे अशी मागणी विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली असल्याचे माहे एप्रिल, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने या विद्यार्थ्यांचे शुल्क माफ करुन ते परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (०७-१०-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लातूर येथील प्रशिक्षणार्थी यांनी दिनांक २७.०५.२०१६ रोजी जिल्हाधिकारी, लातूर यांचेकडे निवेदन दिले आहे.

(३) सदर बाब ही धोरणात्मक स्वरूपाची असून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करण्याची बाब शासनाच्या तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.